दिनांक :      .०३.२०१९

प्रति,

मा. केंद्रीय अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री,

केंद्र सरकार, नवी देहली ११००११

**विषय : दुधात भेसळ करून मानवी जीवनाशी खेळणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याविषयी...**

महोदय,

जन्माला आल्या क्षणापासून कोणत्याही लहान बाळाचे पालनपोषण आईच्या दुधापासून चालू होते. त्यानंतर कोणतेही लहान बाळ आणि सामान्य मनुष्य गाय, म्हैस, बकरी आदी प्राण्यांकडून मिळणारे दूध आहारात घेतात. सध्या बहुतांश ठिकाणी वापरण्यात येणारे दूध गाय किंवा म्हैस यांचे असते आणि ते बहुतांश करून दूध संकलन सोसायट्या आणि मोठी आस्थापने यांच्याकडूनच प्रामुख्याने वितरित केले जाते. या दूधात सध्या खूप मोठ्या प्रमाणात भेसळ केली जाते, असे आढळून येत असल्याच्या बातम्या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होत असतात. खरेतर दूधामध्ये केली जाणारी भेसळ ही जनतेची फसवणूक आणि मानवी आरोग्यासाठी घातकही आहे.

**⁕ तरी या संदर्भात आम्ही काही बाबी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो ...**

१. महाराष्ट्रात २ लक्ष लिटर पाण्याची भेसळ करून दुधाची विक्री केली जात आहे. त्यामुळे ग्राहकांना उच्च दर्जाचे दूध मिळत नाही. राज्यातील महानगरपालिका, नगरपालिका आणि अन्न व औषध प्रशासन या प्रकरणी सक्षमपणे कारवाई करत नसल्यामुळे पाणीदार दुधाचा व्यवसाय वाढला आहे.

२. महाराष्ट्रात प्रतिदिन १ कोटी १५ लक्ष लिटर दुधाचे संकलन होते. मुंबई, पुणे यांसारख्या शहरात ३.५ टक्के स्निग्धांश आणि ८.५ टक्के एस्.एन्.एफ्. गुणवत्तेचे पिशवीबंद दूध विकले पाहिजे, असे बंधन आहे; मात्र नियमाचे पालन न करता २.५ टक्के स्निग्धांश असलेले पिशवीबंद दूध विकले जाते.

३. सध्या बाजारात गोकुळ, वारणा, प्रभात, राजहंस, अमूल यांसह स्थानिक लहान प्रकल्प असे अनुमाने ४०० हून अधिक ब्रँड विविध नावाने पिशवीबंद दूध विक्री करत आहेत. विक्रीची व्यवस्था ही घाऊक आणि किरकोळ विक्रेते यांच्या हातात असल्यामुळे १० टक्के दूध हे पाणीदार असते. याद्वारे ग्राहकांची प्रतीदिन ५० लक्ष रुपयांची फसवणूक होत आहे, तसेच या प्रक्रियेत शेतकरीही भरडला जात आहे.

४. पाणीदार दुधावर कारवाई करण्याचा अधिकार हा महानगरपालिका, नगरपालिका आणि अन्न अन् औषध प्रशासन यांना आहे; मात्र कधीही पाणीदार दुधावर कारवाई केली जात नाही, असा अनुभव सर्वत्र आहे.

५. भारतीय पशु कल्याण मंडळाचे सदस्य मोहन सिंह अहलुवालिया यांनी सांगितले आहे की, देशभरात विकल्या जाणाऱ्या दूध आणि दुग्धजन्य पदार्थांपैकी ६८.७ टक्के उत्पादने भारतीय अन्न सुरक्षा व मानके प्राधिकरण यांच्या मानांकनाप्रमाणे प्रयोगशाळेत शुद्ध नव्हते. त्यामध्ये डिटर्जंट पावडर, कॉस्टिक सोडा, ग्लुकोज, पांढरा रंग आणि रिफाइन तेल आदी भेसळ होते. देशात दक्षिणेतील राज्यांपेक्षा उत्तरेकडील राज्यांमध्ये हे भेसळीचे प्रमाण अधिक आहे, असेही ते म्हणाले.

६. भारतीय अन्न सुरक्षा व मानके प्राधिकरण यांनी केलेल्या सर्वेक्षणानुसार प्रक्रिया केलेल्या विविध दुधांच्या नमुन्यांपैकी ४६.८ टक्के दुधाचे नमुने मानांकनाप्रमाणे शुद्ध नव्हते. त्यातील १७.३ टक्के दूध मानवाच्या प्रकृतीसाठी हानीकारक होते.

७. राजस्थानमध्ये अन्न व औषध प्रशासनाच्या निरीक्षकांनी विविध जिल्ह्यांमध्ये दूध आणि दुग्धजन्य पदार्थ यांची अचानक धाड टाकून पडताळणी केली. त्या वेळी दुधातील 'फॅट' वाढावीत, म्हणून ग्लिसरीनचा वापर, तर तूपामध्ये चरबी मिसळण्यात येत असल्याचे आढळून आले आहे. याचसमवेत आईस्कीम, कुल्फी आदी दुग्धजन्य पदार्थांमध्येही भेसळ होत असल्याचे निरीक्षकांना आढळले.

८. दुधात सध्या भेसळ करण्याचे प्रमाण प्रचंड वाढले आहे. या भेसळीसाठी दुधात वनस्पती तूप, स्टार्च, युरिया, साखर, ग्लुकोज, मालटोडेक्स्ट्रीन, दूध पावडर, ग्लिसरीन, सेल्युलोज, खाद्य तेल, डिटर्जंट पावडर आदी पदार्थ वापरण्यात येतात. अशा दूध उत्पादकांवर धाडी टाकल्या जातात आणि कारवाई होते; मात्र ती तत्कालीक असते.

९. मुंबई येथील दूधविक्रेते ग्राहकांना अनुमाने ७८ टक्के निकृष्ट दर्जाचे दूध पुरवत असल्याचा अहवाल 'कन्झ्युमर गाईडन्स सोसायटी ऑफ इंडिया' या संस्थेने राज्य आणि केंद्र सरकारच्या ग्राहक संरक्षण खात्याकडे सादर केला आहे. सोसायटीने पडताळणीसाठी दुधाचे ६९० नमुने गोळा केले असून त्यातील केवळ २१ टक्केच नमुने पात्र ठरले आहेत. त्यानुसार मुंबई, ठाणे आणि राज्याच्या इतर भागांत दूधभेसळीची मोठी यंत्रणा कार्यरत असल्याचे या क्षेत्रातील जाणकारांचे म्हणणे आहे. अन्न आणि औषध प्रशासन विभागाने 'कन्झ्युमर सोसायटीने आमच्याकडे अहवाल दिल्यास दूध भेसळखोरांवर कारवाई करू', असे म्हटले आहे.

१०. महाराष्ट्राचे अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री गिरीश बापट यांनी विधानसभेत माहिती देतांना म्हटले की, वर्ष २०१७-१८ मध्ये दुधाचे २ सहस्र १३८ नमुने पडताळले. त्यामधील ३९० नमुने अल्प दर्जाचे आणि २०९ नमुने असुरक्षित आढळले. असुरक्षित नमुन्यांवर कारवाई करण्यास कायदे अपुरे आहेत. भेसळ झालेले दूध पकडल्यास त्याविषयीचा अहवाल १४ दिवसांच्या आत सादर करावा लागतो; मात्र भेसळयुक्त दुधाची पडताळणी करण्यासाठी आपणाकडे पुरेशा प्रयोगशाळा नाहीत. त्यामुळे दुधाचे नमुने पडताळण्यासाठी अन्य राज्यांत पाठवावे लागतात. हे अहवाल वेळेत येत नाहीत, त्यामुळे तक्रार कालबाह्य होते आणि गुन्हेगार मोकाट सुटतात. मुंबईमध्ये शेकडो वितरक आहेत. त्यांनी दिलेल्या दुधाच्या पिशव्या सहस्रावधी ठिकाणी जातात. या सर्वांची पडताळणी करणे शक्य नाही. स्वतःचे उत्पन्न वाढण्यासाठी दुधामध्ये इंजेक्शन दिले जाते. या सर्वांचा हेतू कुणाला मारण्याचा नसून उत्पन्न वाढवण्याचा असतो; मात्र हेही धोकादायक असून त्या विरोधातही कारवाई करण्यात येईल, असे म्हटले होते.

**⁕ तरी या निवेदनाद्वारे आम्ही पुढील मागण्या करत आहोत :**

१. शासनाने दूध भेसळ पडताळणी करणयासाठी आवश्यक प्रयोगशाळांची निर्मिती करावी.

२. दूध भेसळ कशी ओळखावी, या दृष्टीने शासनाच्या वतीने 'प्रशिक्षण उपक्रम' राबवावेत, जनसामान्यांना भेसळ ओळखता यावी, यासाठी जनजागृती करणारे कार्यक्रम राबवावेत.

३. व्यावहारिक लाभासाठी दुधात भेसळ करणाऱ्या दूध उत्पादकांवर कठोर कारवाई करण्यासाठी सक्षम कायदे करावेत, तसेच मानवी आरोग्याशी खेळणाऱ्यांसाठी यामध्ये कठोर शिक्षा, जाचक आर्थिक भुर्दंड, तसेच त्यांचा परवाना रहित करण्याच्या तरतुदी असाव्यात.

४. दूध भेसळ करणाऱ्या वितरकांची साखळी शोधून तिच्यावरही कठोर कारवाई करावी.

५. दुधामध्ये इतक्या मोठ्या प्रमाणात प्रतिदिन भेसळ होत असतांना त्याबाबत निष्क्रिय असणारे, हेतूतः दुर्लक्ष करणारे, दूध उत्पादकांशी साटेलोटे असणारे शासनाच्या अन्न व औषध प्रशासन विभागातील अधिकारी आणि कर्मचारी यांच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी.

**प्रत :** मा. अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री, महाराष्ट्र राज्य

आपला विश्वासू,

हिंदु जनजागृती समितीकरिता
(संपर्क : )